फोन : (०२४६२) २२९२४२ / ४३
फॅक्स : (०२४६२) २२९२४५ / २२९३२५

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**

Phone : (02462) 229242 / 43
Fax : (02462) 229245 / 229325

***Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded***

शैक्षणिक / संलग्न / ०३ / २००८–०९ / 1372

दिनांक २७.०९.२००८ 30

प्रती,

**अध्यक्ष / सचिव,**
सरस्वती शिक्षण संस्था,
एस.व्ही.एस.कॅम्पस, मांडवा रोड,
किनवट, जि.नांदेड

**विषय:**– शैक्षणिक वर्ष २००८–०९ या शैक्षणिक वर्षाकरिता **सरस्वती कॉलेज ऑफ मास्टर ऑफ एज्युकेशन, किनवट, नांदेड** या महाविद्यालयास **एम.एड.** या अभ्यासक्रमास प्रथम संलग्निकरण देणे बाबत.

**संदर्भ** : १. मा. कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र.क्र. बी.एड.मान्यता २००८/(३३०/०८) मशि – १, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२, दि. १७.०९.२००८.
२. मा. विभागीय संचालक, एन.सी.टी.ई. भोपाळ यांचे पत्र क्र. WRC/5-6/106th/ 2008/40731 दि. २९.०८.२००८.

महोदय,

उपरोक्त विषयी आपणांस कळविण्यांत येते की आपल्या संस्थेअंतर्गत सरस्वती कॉलेज ऑफ मास्टर ऑफ एज्युकेशन, किनवट, नांदेड या महाविद्यालयास एम.एड. या अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २००८–०९ करिता कायम विना अनुदान तत्वावर सुरू करण्यास संदर्भीय पत्र क. १ व २ अन्वये अनुकमे महाराष्ट्र शासन व एन.सी.टी.ई. भोपाळने परवानगी दिली आहे.

महाराष्ट्र शासनाने व एन.सी.टी.ई. भोपाळने संदर्भीय पत्रान्वये परवानगी दिलेल्या सरस्वती कॉलेज ऑफ मास्टर ऑफ एज्युकेशन, किनवट, नांदेड या महाविद्यालयास एम.एड. या अभ्यासक्रमास या प्रथम संलग्निकरणा बाबत महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ च्या कलम ८३ (२) अन्वये गठीत करण्यात आलेल्या त्रिसदस्यीय समितीने प्रत्यक्ष पहाणी करून सादर केलेल्या अहवालानुसार खालील अटींच्या पुर्तेच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २००८–२००९ करीता तात्पुरते / प्राथमिक संलग्निकरण देण्यांत येत आहे.

अटी :–
१) विद्यापीठ नियमानुसार निवड समिती मार्फत शिक्षकांच्या नेमणुका कराव्यात.
२) ग्रंथालयात पुस्तकांची व शैक्षणिक मासीकांची संख्या वाढवावी.
३) अभ्यासकक्ष स्वतंत्र व प्रशस्त असावे.

तथापि, प्रथम संलग्निकरण समितीची शिफारस व आगामी मा.विद्या परिषदेच्या मान्यतेच्या अधीन राहूनच प्रथम संलग्निकरणाची कार्यवाही करण्यांत येईल. यास्तव महाविद्यालयास प्रथम संलग्निकरण प्राप्त करून घेणे बंधनकारक राहील. अन्यथा पुढील वर्षी संलग्निकरणाचे नूतनीकरण करता येणार नाही, याची नोंद घ्यावी. विद्यापीठाने व शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या नियमाचे पालन करणे आपल्यावर बंधनकारक राहील.

आपला विश्वासु
संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव :–
१) मा.सहसंचालक, उच्च शिक्षण नांदेड विभाग, नांदेड.
२) मा. परीक्षा नियंत्रक, प्रस्तुत विद्यापीठ.
३) सहा.कुलसचिव, पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
४) सहायक अधिक्षक, अभ्यासक्रम कक्ष व मान्यता कक्ष, शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ

संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ



Principal
Saraswati College of Education
Kinwat Dist. Nanded

I/C.Principal
Saraswati College of Education
Kinwat, Dist. Nanded.